# प्रेसनोट दि.२९/०८/२०१८

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन बुधवार पेठेत छापा टाकुन २ बांगलादेशी सज्ञान पिडीत मुलींची सुटका

दि.२८/०८/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना पोलीस नाईक तुषार आल्हाट यांचे कडुन माहीती मिळाली की, क्रांती हॉटेल चौकाजवळील न्यु सागर बिल्डींग मधील तळमजल्याचे खोलीत राज्यातील व परराज्यातील सज्ञान मुलींकडुन वेश्याव्यवसाय करुन घेतला जातो. त्यात दोन बांगलादेशी सज्ञान मुलींचा समावेश असुन त्यांचेकडुन जबरदस्तीने हे काम करवुन घेतले जात आहे, बाबत माहीती मिळाले वरुन सामाजिक सुरक्षा विभागाच्या वतीने तात्काळ पडताळणी द्वारे छापा कारवाई करण्यात आली. यादरम्यान सदर दोन बांगलादेशी सज्ञान पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका केली. सदर प्रकरणी कुंटणखाना मालकीण मिना राजेश शर्मा वय ३० वर्षे रा क्रांती हॉटेल चौकाजवळील न्यु सागर बिल्डींग बुधवार पेठ पुणे हिचे विरुध्द फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुरनं. २१५/२०१८ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७०(अ) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास फरासखाना पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे.

कारवाईचे वेळी रोख रु.१५००/- रुपये व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. शिरिष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, पोउनि आनंत व्यवहारे,तुषार आल्हाट, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, राजाराम घोगरे, राजेद्र कचरे, अनुराधा धुमाळ, रेवनसिध्द नरुटे, सुनिल नाईक, राजेद्र कचरे, राजेद्र ननावरे, प्रदिप शेलार यांनी कारवाई केली आहे.